# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल




बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# नदीत कचरा टाकणाऱ्यांची आता खैर नाही!

## नद्यांचे संवर्धन करण्यासाठी ‘नदी सुरक्षा दला’ची नेमणूक



**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** शहरातील नद्यांचे संवर्धन करण्यासाठी नदी सुरक्षा दलाची नेमणूक करण्यात येणार असून त्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची मदत घेण्यात येणार आहे. नदीकाठच्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. तसेच नद्यांमध्ये कोणत्याही प्रकारचा बांधकाम राडारोडा, कचरा टाकणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. नदी संवर्धनासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येणार असून त्यासाठी विविध सामाजिक संस्था आणि शैक्षणिक संस्थाचीही मदत घेण्यात येईल, असे आयुक्त शेखर सिंह म्हणाले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृह येथे नदी संवर्धन या विषयासंदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी आयुक्त सिंह बोलत होते. या बैठकीला अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, सह शहर अभियंता संजय कुलकर्णी, कार्यकारी अभियंता हरविंदरसिंग बंसल, अनिल राऊत, उप अभियंता योगेश अल्हाट तसेच सिटिझन फोरमचे तुषार शिंदे, इन्होवेशन ॲन्ड इन्क्युबेशन फाऊंडेशनचे संजय लकडे, जलदिंडीचे राजीव भावसार, सुर्यकांत मुथियान तसेच विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांचे शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. आयुक्त सिंह यावेळी म्हणाले, नदी संवर्धनासाठी महापालिकेच्या वतीने विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. ड्रेनेज किंवा नाल्यांमधून नदीमध्ये दुषित किंवा मैलामिश्रीत पाणी जाऊ नये यासाठी सर्वेक्षण सुरू असून या सर्वेक्षणासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. नाल्यांद्वारे नदीमध्ये कचरा, प्लॅस्टीक, दुषित पाणी जाऊ नये यासाठी नाल्यांवर मॅकेनिकल स्क्रीन्स लावण्यात आल्या आहेत. तसेच शहरात अनेक ठिकाणी जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात आले असून नवीन प्रकल्पांचे काम प्रगतीपथावर आहे. महापालिका हद्दीतील पवना, इंद्रायणी नद्या प्रदुषणमुक्त करण्यासाठी उगमापासून ते संगमापर्यंत पाहणी करण्यात येत आहे. पण यासाठी नागरिकांमध्येही जनजागृती होणे गरजेचे असून सामाजिक संस्था तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक आणि मुख्याध्यापकांची मदत घेऊन त्यांच्याद्वारे जनजागृती करून नदी संवर्धनास मदत होऊ शकते. नदीपात्रात कचरा टाकताना कोणी आढळल्यास त्या व्यक्तीचे किंवा त्या परिसराचे छायाचित्र काढून स्मार्ट सारथी ॲपमधील 'पोस्ट अ वेस्ट' या सुविधेच्या आधारे विद्यार्थी महापालिकेशी संपर्क साधु शकतात. माहिती मिळताच महापालिकेच्या वतीने संबंधित व्यक्तीवर कारवाई करण्यात येईल तसेच नदीकाठी पडलेला राडारोडा किंवा कचरा उचलण्यात येईल. पथनाट्य, पदयात्रा यांद्वारे नदीकाठच्या नागरिकांमध्ये जनजागृती करून विद्यार्थी, शिक्षक नदी संवर्धनासाठी महापालिकेस तसेच सामाजिक संस्थांना सहकार्य करू शकतात, असेही आयुक्त सिंह यावेळी म्हणाले. या बैठकीच्या वेळी सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींनी, शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी नदी संवर्धनासाठीच्या आपल्या प्रतिक्रिया आयुक्तांसमोर मांडल्या.

### प्रकल्पांचे काम प्रगतीपथावर

» नदी संवर्धनासाठी महापालिकेच्या वतीने विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. ड्रेनेज किंवा नाल्यांमधून नदीमध्ये दूषित किंवा मैलामिश्रीत पाणी जाऊ नये यासाठी सर्वेक्षण सुरू असून या सर्वे क्षणासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. नाल्यांद्वारे नदीमध्ये कचरा, प्लॅस्टीक, दूषित पाणी जाऊ नये यासाठी नाल्यांवर मॅकेनिकल स्क्रीन्स लावण्यात आल्या आहेत. तसेच शहरात अनेक ठिकाणी जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात आले असून नवीन प्रकल्पांचे काम प्रगतीपथावर आहे.

# दादांच्या बालेकिल्ल्यात रोहित पवारांच्या दौऱ्याचा धडाका!

## चुलते-पुतणे असे राजकारण सुरू झालं आहे का?




**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** शरद पवार गटाने अजित पवारांचा बालेकिल्ला म्हणून ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवडमध्ये अधिक जोर लावला आहे. जयंत पाटील, रोहित पवार यांनी पिंपरी-चिंचवड शहराच्या दौऱ्याचा धडाका लावला आहे. मंगळवारी पुन्हा शरद पवार गटाचे नेते आमदार रोहित पवार हे पिंपरी-चिंचवड दौऱ्यावर आहेत. ते सामाजिक कार्यकर्त्यांसह महत्वाच्या व्यक्तींची भेट घेणार आहेत, अशी माहिती शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामटे यांनी दिली. गेल्या काही दिवसांपासून पिंपरी-चिंचवड शहरात अजित पवारांपेक्षा शरद पवार गटाची चर्चा होत असल्याचं बघायला मिळत आहे.

राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर पिंपरी-चिंचवड शहरातदेखील राष्ट्रवादीचे दोन पक्ष निर्माण झाले आहेत. परंतु, अजित पवारांच्या बालेकिल्ल्यातच शरद पवार गटाची सरशी दिसत आहे. दोन गट पडल्यापासून रोहित पवार यांनी आपलं पूर्ण लक्ष पिंपरी-चिंचवड शहरावर केंद्रित केल आहे. शहरामध्ये भाजपादेखील यामुळे काही प्रमाणात दुर्लक्षित झाल्याचे चित्र आहे. अजित पवार गट आणि शरद पवार गट या दोन्ही पक्षांची शहरात चर्चा असून रोहित पवार आणि अजित पवार असे काका पुतण्याचं राजकारण शहरात बघायला मिळू शकतं. शहराध्यक्ष तुषार कामटे यांनी अनेक दिग्गज नेत्यांना शरद पवार गटात सामावून घेतलं आहे. आणखी काही नेते त्यांच्या संपर्कात असून ते लवकरच शरद पवार आणि रोहित पवार यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश करणार असल्याचे त्यांनी लोकसत्ता ऑनलाइनशी बोलताना सांगितलं.

# 'आपले शहर सायकल शहर' उपक्रमांतर्गत परिसर होणार पर्यावरणपूरक

## नगरसेवक शत्रुघ्न काटे यांच्या हस्ते १५० पेक्षा जास्त सायकलींचे वाटप

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** घटस्थापनेच्या शुभ मुहूर्तावर आपले शहर सायकल शहर या उपक्रम अंतर्गत अल्प दरात दिल्या जाणाऱ्या सायकलचे रविवारी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. आपले शहर सायकल शहर या उपक्रम अंतर्गत साधारण १५० पेक्षा जास्त सायकलींचे वाटप आज करण्यात आले. नगरसेवक शत्रुघ्न काटे म्हणाले, पिंपळे सौदागर हे स्मार्ट सिटी म्हणून झपाट्याने विकसित होत आहे. परिसरात अद्यावत मैदाने, उद्याने, रस्ते विकसित करण्यात आले आहे. तसेच



रस्त्याच्या दुतर्फा सायकल ट्रक सुद्धा विकसित करण्यात आले आहे; परंतु त्याचा वापर होताना मात्र दिसून येत नाही, हे खेदजनक आहे. म्हणून आपले शहर सायकल शहर उपक्रमांतर्गत अल्प दरात सायकल उपलब्ध करून दिल्यास नक्कीच रस्त्यावर सायकलींचे प्रमाण वाढेले आणि परिणामी सायकल ट्रॅकचा वापर सुद्धा वाढेल. सायकलिंगमुळे शरीराला व्यायाम मिळण्याबरोबरच प्रदूषण रोखण्याची महत्वाची जबाबदारी पार पडत असते. शहरातील प्रदूषण मोठ्या प्रमाणावर वाढत असून याबाबत निव्वळ चर्चा करण्यापेक्षा ते रोखण्यासाठी सायकल विषयी जनजागृती करण्यास आपल्यापासून सुरुवात केली पाहिजे. दररोज सकाळी सायकवरून फेरफटका मारण्याच्या सवयीमुळे तरुणाईसुद्धा सायकलकडे आकर्षित होत आहे. शाळा आणि कॉलेजात शिकणारे विद्यार्थी आणि तरुण हे मोठ्या हिरीरीने सायकलला प्राधान्य देताना दिसत आहे.

# निगडीतील एनआयबीआर कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंटमध्ये आंतरराष्ट्रीय ब्रेड डे उत्साहात!

## उत्तम ब्रेड्स सोबतच कल्पक मांडणीमुळे हा ब्रेड डिस्प्ले खूपच लक्षवेधक ठरला

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** आंतरराष्ट्रीय ब्रेड डे' चे औचित्य साधून निगडीतील एनआयबीआर कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट मधील विद्यार्थ्यांनी जगातल्या वेगवेगळ्या देशांतील पन्नासहून अधिक नाविन्यपूर्ण ब्रेड्स बनवून त्याचे प्रदर्शन आयोजित केले होते. पिता ब्रेड, ब्रिओश, मशरूम ब्रेड, मल्टी ग्रेन ब्रेड, स्पिनाच स्किलेट्स, फोकॅशिया असे वैविध्यपूर्ण ब्रेडचे प्रकार



विद्यार्थ्यांनी बनवले होते. अतिशय उत्तम ब्रेड्स सोबतच कल्पक मांडणीमुळे हा ब्रेड डिस्प्ले खूपच लक्षवेधक ठरला व सर्व उपस्थितांच्या पसंतीस उतरला. याप्रसंगी नोव्हेल ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष अमित गोरखे म्हणाले की, असे कलात्मक आणि गुणात्मक उपक्रम हे नेहमीच एनआयबीआर कॉलेजचे वैशिष्ट्य राहिले आहे. आणि त्यामुळेच येथील विद्यार्थी जागतिक पातळीवर हॉस्पिटॅलिटी क्षेत्रात यशस्वी होऊन कॉलेजचे आणि त्यांच्या पालकांचेही नाव उज्वल करत असून भविष्यात सुध्दा करत राहतील. एवढ्या लहान वयात ह्या विद्यार्थ्यांनी अविरत परिश्रम घेऊन जे वेगवेगळे ब्रेड आणि रोल्स बनविले, त्याचा उपयोग त्यांना भविष्यात यशस्वी उद्योजक बनण्यासाठी नक्कीच होईल, असा विश्वास संस्थेचे विश्वस्त विलास जेऊरकर यांनी व्यक्त केला. हा ब्रेड डे यशस्वी करण्यासाठी सर्व विद्यार्थी गेले दहा दिवस प्रा. यशवंत सटाणकर यांच्या मार्गदर्शनाखाली अविरत मेहनत घेत होते. या ब्रेड डे चे विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी सॉल्ट डो पासून बनविलेली खेळणी व प्राणी यांचे आकर्षक डिझाईन्स व तितकीच उत्कृष्ट सजावट हे ठरले. ह्या कार्यक्रमास उपस्थित राहुन माजी नगरसेविक अनुराधा गोरखे, वैशाली खाड्ये, संस्थेच्या उपाध्यक्षा डॉ. प्रिया गोरखे, आणि विश्वस्त समीर जेऊरकर यांनी सर्व विद्यार्थी आणि प्राध्यापक वृंदास शुभेच्छा दिल्या.

# नवले पुलावर पुन्हा भीषण अपघात!

## कंटेनरच्या धडकेनंतर ट्रकने पेट घेतला, चार जणांचा होरपळून मृत्यू



**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुण्यातील नवले पुलाजवळ पुन्हा एकदा जीवघेणा अपघात झाला आहे. कंटेनरची धडक झाल्याने ट्रकने पेट घेतला आणि त्याला आग लागली. या आगीत ट्रकच्या केबीनमध्ये बसून प्रवास करणारे चारजण होरपळून मृत्यूमुखी पडलेत. तर इतर जखमी झालेत. ही आग विझवण्यात अग्नीशमन दलाला यश आलं आहे. पुण्यातील नवले पुलावर अपघाताचं सत्र सुरूच असून पुन्हा एकदा जीवघेणा अपघात झाला आहे. हा अपघात नऱ्हे येथील स्वामी नारायण मंदिराजवळ रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास घडला. मक्याचा भुसा घेऊन साताऱ्याच्या दिशेकडून मुंबईच्या दिशेने निघालेला ट्रक नऱ्हे येथील स्वामी नारायण मंदिराजवळ आला असता, ट्रकचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने समोर असणाऱ्या कंटेनरला पाठीमागून जोरदार धडक दिली. यात कंटेनर रस्त्यावरच उलटला. मात्र धडक मोठी बसल्याने ट्रकला क्षणातच आग लागली. यात ट्रकच्या केबिन मध्ये बसलेले चार जणांचा होरपळून जागीच मृत्यू झाला तर दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत. अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळवून मृतदेह बाहेर काढले. अपघातानंतर लागलेल्या आगीमध्ये होरपळून मृत्यूमुखी पडलेल्या मृतांचा आकडा चार इतका आहे. तर दोन गंभीर जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. ही आग अग्निशमन दलाने नियंत्रणात आणली आहे. परंतु नवले पूल हा किती धोकादायक आहे हे या घटनेवरून पुन्हा एकदा सिद्ध झालं आहे. या पुलाची रचना चुकीची असल्याचं अनेकांनी वेळोवेळी निदर्शनास आणली आहे. परंतु राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरणाने यावर कोणतीही कारवाई केली नाही. पुण्यातील नवले पूल हा अपघातांसाठी बदनाम झाला आहे. या पुलावर आतापर्यंत अनेक जीवघेणे अपघात झाले असून त्यामध्ये अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. या पुलावर वारंवार घडणाऱ्या अपघातांच्या मालिकेमुळे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या विरोधात नागरिक संतप्त झालेले पाहायला मिळत आहेत. याबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या वतीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी स्थानिकांकडून होते आहे.

# भिडे वाडा स्मारकाचा प्रश्न अखेर निकाली!

## उच्च न्यायालयातील खटल्यामध्ये पुणे महापालिकेचा विजय




**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले या दाम्पत्यानं मुलींची पहिली शाळा पुण्यातील ज्या वाड्यात सुरु केली होती त्या भिडे वाड्याच्या राष्ट्रीय स्मारकासाठीचा न्यायालयीन प्रक्रियेत अडकलेला प्रश्न अखेर निकाली निघाला आहे.

भिडे वाड्यासंदर्भातील उच्च न्यायालयातील खटल्यामध्ये पुणे महापालिका आणि राज्य सरकारचा विजय झाला आहे. त्यामुळे आता लवकरच या शाळेचे स्मारकात रुपांतर करण्याचे काम तातडीने काम सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोमवारी दिली. फुले दाम्पत्याने १ जानेवारी १८४८ रोजी बुधवार पेठ परिसरातील भिडे वाड्यात मुलींसाठी शाळा सुरू केली. त्याचे राष्ट्रीय स्मारक व्हावे अशी मागणी 'मुलींची पहिली शाळा सार्वजनिक स्मारक समिती'च्या वतीनं पुढे आली. शाळेच्या स्थापनेला १९९८ मध्ये दीडशे वर्षे पूर्ण झाली, त्यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव आणि नितीन पवार यांनी या मागणीसाठी फुले वाडा ते भिडे वाडा असा मोर्चा काढला होता. त्या वेळेपासून हे स्मारक करावे, या मागणीने जोर धरला होता. भिडे वाड्यामध्ये आता दोन गुंठे जागा राहिली आहे. जागा मालक आणि भाडेकरू यांच्यातील वाद न्यायालयात होता. यामध्ये राज्य सरकारनं महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यासाठी गेल्या २३ वर्षांपासून लढा दिला गेला होता. मात्र, हा प्रश्न सुटण्यासाठी अखेर २०२३ हे वर्ष उजाडावे लागले.

> **“ पुणेकरांसाठी आजचा दिवस ऐतिहासिक आहे. भिडे वाड्याचे राष्ट्रीय स्मारक होण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल पुढे पडले आहे. त्यासाठी पालकमंत्री या नात्याने मी सातत्याने प्रयत्नशील होतो. शासनाकडून निधीची तरतूद झाल्यानंतर जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात राज्याचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांची भेट घेतली होती. या भेटीत त्यांनी भिडे वाड्यासंदर्भातील शासनाच्या भूमिकेसंदर्भात माहिती दिली होती. तसेच उच्च न्यायालयात यासंदर्भात शासनाची भूमिका प्रभावपीणे मांडावी, अशी विनंतीही केली होती. त्यानुसार उच्च न्यायालयाने ही भिडे वाड्याची जागा स्मारकासाठी देण्याच्या बाजूने निकाल दिला.**
>
> — चंद्रकांत पाटील, उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री

# सहायक पोलीस आयुक्तांना कारणे दाखवा!

## १५ दिवसांत लेखी म्हणणे सादर करकरण्याचे न्यायालयाचे आदेश

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** ससून रुग्णालयातून २ ऑक्टोबर २०२३ रोजी अमली पदार्थ तस्कर ललित पाटील पळून गेला. त्या आरोपीचा शोध सुरू आहे.त्याच दरम्यान ललित पाटीलचा भाऊ भूषण पाटील आणि अभिषेक बलकवडे या दोघा आरोपींना अटक करण्यात आली होती.त्या दोघांची आज पोलीस कोठडी संपत आल्याने, न्यायालयामध्ये हजर केल्यावर २० ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली. पण या सुनावणीवेळी महाराष्ट्र पोलिस अधिनियमानुसार न्यायालयीन कामकाजावेळी गणवेशात हजर न झाल्याने गुन्हे शाखेचे सहायक पोलिस आयुक्त सुनील तांबे यांच्यावर नियमांची पायमल्ली केल्याचा ठपका ठेवत न्यायालयाने शिस्तभंगाबाबत कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. या नोटीशीला १५ दिवसांत पोलिस आयुक्तांमार्फत लेखी म्हणणे सादर करण्यात यावे असे नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी ए. सी. बिराजदार यांनी ही नोटीस दिली.ससूनमधील अमली पदार्थ तस्कर ललित पाटील पळून जाऊन तेरा दिवस झाले आहे.त्या आरोपीचा शोध सुरू असताना पुणे पोलिसांनी आरोपी भूषण पाटील आणि अभिषेक बलकवडे यांची



पोलिस कोठडीची मुदत आज संपत असल्याने न्यायालयात हजर करण्यात आले होते. तर या गुन्ह्याचा तपास गुन्हे शाखेचे सहायक पोलिस आयुक्त सुनील तांबे हे करीत असून ते न्यायालयात उपस्थित होते. मात्र त्यांनी गणवेश परिधान केला नव्हता.ही बाब न्यायाधीश ए. सी.बिराजदार यांच्या लक्षात येताच, तुम्ही गणवेशामध्ये का आला नाहीत ? अशी विचारणा केली.पुढच्या वेळी नक्की काळजी घेईन असे उत्तर सुनील तांबे यांनी न्यायालयाला दिले.पण हे उत्तर समाधानकारक वाटले नाही. तुम्ही नियमांची पायमल्ली आणि नियमभंग करून न्यायालयीन कामकाजासाठी न्यायालयासमोर उपस्थित राहिला आहात.तुमचे हे कृत्य पोलिस अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठी मुळीच दिशादर्शक, अनुकरणीय नाही. न्यायालयीन कामकाजावेळी गणवेश परिधान करून न्यायालयात उपस्थित राहणे पोलिसांवर कायदेशीर बंधनकारक आहे. तसे न केल्याने केवळ पोलिस खात्याचीच नव्हे तर, न्यायालयाच्या प्रतिमा आणि प्रतिष्ठेस बाधा निर्माण झाली आहे.

### याबाबत लेखी खुलासा द्यावा

**» तुम्ही गणवेशामध्ये का आला नाहीत ? अशी विचारणा केली. पुढच्या वेळी नक्की काळजी घेईन असे उत्तर सुनील तांबे यांनी न्यायालयाला दिले. पण हे उत्तर समाधानकारक वाटले नाही. नियमांचा भंग करणाऱ्या या कृत्यास गैरवर्तन का समजू नये. तसेच याबाबतचा अहवाल शिस्तभंग प्राधिकाऱ्याकडे का पाठविण्यात येऊ नये. याबाबत लेखी खुलासा द्यावा,असे नोटीसमध्ये यावेळी नमूद करण्यात आले.**

# शिक्षक भरतीसाठी २३ जिल्ह्यांतील रिक्त पदांची जाहिरात लवकरच!

## लाखो उमेदवारांचे रिक्त पदांच्या जाहिरातीकडे लागले लक्ष

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** राज्यात शिक्षकांच्या ३० हजार पदांची भरती प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. आतापर्यंत बिंदूनामावली आणि अन्य तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झालेल्या २३ जिल्ह्यातील रिक्त पदांची जाहिरात लवकरच प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी दिली.

राज्यात पवित्र संकेतस्थळामार्फत शिक्षक भरती प्रक्रिया राबवण्यात येत आहे. पेसाअंतर्गत रिक्त पदांची भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.



### तांत्रिक प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक

**» राज्यात पवित्र संकेतस्थळामार्फत शिक्षक भरती प्रक्रिया राबवण्यात येत आहे. पेसाअंतर्गत रिक्त पदांची भरती प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. मात्र राज्यातील लाखो उमेदवारांचे लक्ष स्थानिक स्वराज्य संस्थांतील रिक्त पदांच्या जाहिरातीकडे लागले आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षण परिषदेसाठी पुण्यात आलेले शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर म्हणाले, की शिक्षकांच्या ३० हजार रिक्त पदांच्या भरतीसाठी बिंदूनामावली सारख्या तांत्रिक प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक आहे.**

मात्र राज्यातील लाखो उमेदवारांचे लक्ष स्थानिक स्वराज्य संस्थांतील रिक्त पदांच्या जाहिरातीकडे लागले आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षण परिषदेसाठी पुण्यात आलेले शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर म्हणाले, की शिक्षकांच्या ३० हजार रिक्त पदांच्या भरतीसाठी बिंदूनामावलीसारख्या तांत्रिक प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक आहे. आतापर्यंत २३ जिल्ह्यांची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यामुळे या जिल्ह्यांतील रिक्त पदांची जाहिरात प्रसिद्ध करण्यात येईल. उर्वरित जिल्ह्यांसाठी थांबून एकत्रित जाहिरात प्रसिद्ध करायची झाल्यास त्यात आणखी वेळ जाईल. उर्वरित जिल्ह्यांची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर त्यांची जाहिरातही प्रसिद्ध केली जाईल.

# टँकरच्या धडकेत ; जुळ्या मुलींचा मृत्यू

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** इंधन वाहतूक करणाऱ्या भरधाव टँकरने दुचाकीला धडक दिल्याने सहप्रवासी जुळ्या बहिणींचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना विश्रांतवाडी चौकात सोमवारी घडली. अपघातात मुलींची आई गंभीर जखमी झाली आहे. याप्रकरणी टँकरचालकाला रात्री अटक करण्यात आली. साक्षी सतीशकुमार झा आणि श्रद्धा सतीशकुमार झा (वय साडेतीन वर्षे) अशी मृत्युमुखी पडलेल्या जुळ्या मुलींची नावे आहेत. अपघातात त्यांची आई किरण सतीशकुमार झा (वय ३८, रा. संत तुकारामनगर, भोसरी) गंभीर जखमी झाल्या असून, त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहे. याप्रकरणी टँकरचालक प्रमोदकुमार यादव याला अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, झा कुटुंबीय मूळचे उत्तरप्रदेशातील आहे. सतीशकुमार पुण्यात नोकरी करत होते. सोमवारी ते येरवड्यातील शास्त्रीनगर परिसरातील एका रुग्णालयात गेले होते. दुपारी साडेचारच्या सुमारास दुचाकीस्वार सतीशकुमार, त्यांची पत्नी किरण, जुळ्या मुली साक्षी आणि श्रद्धा निघाले होते. विश्रांतवाडी चौकातून ते आळंदीकडे निघाले होते. विश्रांतवाडी चौकातील सिग्नल ते थांबले होते. सिग्नल सुरू झाल्यानंतर पाठीमागून भरधाव निघालेल्या टँकरने दुचाकीला पाठीमागून धडक दिली. दुचाकीस्वार सतीशकुमार फेकले गेल्याने त्यांना किरकोळ दुखापत झाली.